**“कांदा बाजारभावातील घसरण व कांद्याबाबत सर्वंकष तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना” यासाठी गठित सचिव स्तरीय समिती अंतर्गत उप समिती नियुक्त करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक:-बैठक-२०२६/प्र.क्र.७०/२४-स**
**मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२**
दिनांक :- ०९ जून, २०२६

**संदर्भ:-** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना:-**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी तातडीच्या व दिर्घकालीन उपाययोजना सूचविण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सचिव स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील कांद्याच्या दर घसरणीमुळे सुरू असलेली परिस्थिती विचारात घेता कांदा दर घसरण, कांदा निर्यात धोरण यांसारख्या विषयावर तज्ञ असणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवाचा/ ज्ञानाचा उपयोग कांद्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी मंत्रालयीन सचिव स्तरीय समिती अंतर्गत उप समिती नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

“कांदा बाजारभावातील घसरण व कांद्याबाबत सर्वंकष तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना”यासंदर्भात शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल, २०२६ अन्वये मंत्रालयीन सचिव स्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. सदर समिती अंतर्गत कांद्यासंदर्भात विविध उपाययोजनांचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे उप समिती नियुक्त करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तज्ञ सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.किसनराव लवांडे, माजी कुलगुरू | सदस्य |
| २ | श्री.सुनिल पवार, माजी पणन संचालक | सदस्य |
| ३ | श्री.सारंग निर्मल, अध्यक्ष, Indo Vegetables Development Association, अहिल्यानगर | सदस्य |
| ४ | श्री.नरेंद्र पवार, प्रवर्तक, आठवडे बाजार | सदस्य |
| ५ | श्री.शरद जरे, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे | **सदस्य सचिव** |

**०२. समितीची कार्यकक्षा :-**

I. कृषि विद्यापीठांनी तयार केलेला चांगल्या प्रतीचा कांदा कृषि मुल्य साखळीमध्ये कसा आणता येईल सविस्तर अहवाल

II. कांदा दर घसरणीच्या परिस्थितीची कारणमीमांसा

III. कांदा दर घसरण, उच्च तापमानातील साठवणुकीचे तपशील, त्यापासून होणारे फायदे आणि त्यांची खर्च रचना यांचा उत्पादन खर्चावरील परिणाम, अंदाजीत उत्पादन खर्च याबाबत SOP

IV. कांद्यापासून उपउत्पादन (Byproduct) याबाबत रितसर अहवाल

V. मागील सात आठ वर्षांत केंद्र शासनाचे कांदा निर्यातीचे धोरण आणि त्याचा कांदा बाजारभावावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करुन आकडेवारी सह तपशील

VI. राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्र, राजगुरूनगर यांनी विकसीत केलेल्या कांदा साठवणूक केंद्रांना भेट देऊन अहवाल

**०३. समितीचा कार्यकाल :-**

सदर उप समितीने १५ दिवसांत शिफारशी सह अहवाल शासनास सादर करावा.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६०९१४४१५७९४०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2026.06.09 14:42:51 +05'30'

**(अनिरुध्द सू.देशपांडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
३) अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव ( सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव(कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) सह सचिव(पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
१०) डॉ.किसनराव लवांडे, माजी कुलगुरू
११) श्री.सुनिल पवार, माजी पणन संचालक
१२) संबंधित सदस्य
१३) निवडनस्ती (२४-स)